-: प्रेसनोट दिनांक - ०३/०५/२०१९ :-

**आरोपी लोकसेवक चंदन कोंडिबा कांबळे, वय-५७, विस्तार अधिकारी, जिल्हा दुग्ध विकास अधिकारी कार्यालय, ताराबाई पार्क, कोल्हापूर वर्ग-३ यांनी लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहात पकडलेबाबत.**

---

तक्रारदार यांनी यवलुज गावामध्ये त्यांची पत्नी आणि इतर महिला सदस्यांनी एकत्र येवुन श्री.महालक्ष्मी महिला दुध संस्था मर्या. यवलुज, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर ही दुध संस्था (डेअरी) स्थापन केली आहे. त्या दुध संस्थे मध्ये तक्रारदार हे सचिव असुन त्यांची पत्नी या मुख्य प्रवर्तक आहेत. तक्रारदार यांच्या दुध संस्थेची नोंदणी करणे करीता जिल्हा दुग्ध विकास अधिकारी कार्यालय ताराबाई पार्क, कोल्हापूर येथे अर्ज प्रस्ताव सुमारे एक वर्षापुर्वी तक्रारदार यांनी सादर केला आहे. त्या कामाचा पाठपुरावा तेव्हा पासुन तक्रारदार हे करीत होते. त्यानंतर सुमारे दोन महिण्यापुर्वी तक्रारदार यांनी त्यांच्या दुध संस्थेचा अर्ज प्रस्तावा बाबत काय कारवाई केली ? याची विचारणा करणे करीता तक्रारदार यांनी जिल्हा दुग्ध विकास अधिकारी ताराबाई पार्क कार्यालय कोल्हापूर येथे जावुन तेथील संबंधीत विस्तार अधिकारी चंदन कांबळे यांची भेट घेवून विचारणा केली असता, विस्तार अधिकारी चंदन कांबळे यांनी तक्रारदार यांना त्यांच्या दुध संस्थेची कागदपत्रे पुणे येथील कार्यालयात मंजुरी करीता पाठवावी लागतात. ती कागदपत्रे पाठविणेसाठी त्यांनी तक्रारदार यांच्याकडे १०,०००/- रुपये द्यावे लागतील. तसेच गावातील इतर संस्थेंचे नाहरकत दाखले व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कोल्हापूर यांचा पशुधना बाबतचा दाखला अशी कागदपत्रे द्यावी लागतील असे सांगून तक्रारदार यांच्याकडे १०,०००/- रुपये लाचेची मागणी केली. त्याबाबत तक्रारदार यांनी जिल्हा दुग्ध विकास अधिकारी कार्यालय ताराबाई पार्क, कोल्हापूर येथील विस्तार अधिकारी चंदन कांबळे यांचेविरुध्द दिनांक २५/०४/२०१९ रोजी तक्रारी अर्ज दिला.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दिनांक २५/०४/२०१९ रोजी शासकीय पंच साक्षीदार यांचे समक्ष जिल्हा दुग्ध विकास अधिकारी कार्यालय ताराबाई पार्क, कोल्हापूर येथे लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणी मध्ये जिल्हा दुग्ध विकास अधिकारी कार्यालय ताराबाई पार्क, कोल्हापूर येथील विस्तार अधिकारी चंदन कांबळे यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांच्या दुध संस्थेची कागदपत्रे पुणे येथील कार्यालयात प्रस्ताव मंजुरी करीता पाठविणेसाठी ती कागदपत्रे बायहॅन्ड देतो असे सांगून १०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम लागलीच दुग्ध विकास कार्यालय ताराबाई पार्क कोल्हापूर येथे घेवून येण्यास सांगितलेचे पडताळणी मध्ये निष्पन्न झाले.

त्याप्रमाणे दिनांक २५/०४/२०१९ रोजी जिल्हा दुग्ध विकास अधिकारी कार्यालय ताराबाई पार्क,कोल्हापूर येथे विस्तार अधिकारी चंदन कांबळे यांचेविरुध्द सापळयाचे आयोजन केले असता, विस्तार अधिकारी चंदन कांबळे यांनी प्रस्ताव पूर्ण झालेनंतर सोमवार-मंगळवार बघू असे सांगून त्या दिवशी लाच रक्कम स्विकारली नाही. त्यानंतर आज दिनांक ०३/०५/२०१९ रोजी तक्रारदार यांनी विस्तार अधिकारी चंदन कांबळे यांना फोन करुन त्यांच्या दुध डेअरीच्या प्रस्ताव मंजुरीच्या कागदपत्रांबाबत विचारणा केली असता, विस्तार अधिकारी कांबळे यांनी प्रस्तावाची सर्व कागदपत्रे तयार आहेत. दुपारनंतर कार्यालयामध्ये येवून भेट घेवून प्रस्तावाची कागदपत्रे घेवून जावा असे सांगितल्याने आज दिनांक ०३/०५/२०१९ रोजी जिल्हा दुग्ध विकास अधिकारी कार्यालय ताराबाई पार्क, कोल्हापूर येथे विस्तार अधिकारी चंदन कांबळे यांचेविरुध्द सापळयाचे आयोजन केले असता, विस्तार अधिकारी चंदन कांबळे यांनी तक्रारदार यांना ते भाडेकरु म्हणून राहत असलेल्या अजिंक्य तारा कॉलनी येथील राहते घरामध्ये घेवून गेले. त्यावेळी त्याठिकाणी विस्तार अधिकारी चंदन कांबळे यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांच्या दुध संस्थेची कागदपत्रे पुणे येथील कार्यालयात प्रस्ताव मंजुरी करीता पाठविणेसाठी ती कागदपत्रे बायहॅन्ड देतो असे सांगून १०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम पंच साक्षीदार यांचे समक्ष त्यांच्या राहते घरामध्ये स्विकारुन ती कागदपत्रे तक्रारदार यांना दिली असता विस्तार अधिकारी चंदन कांबळे यांना रंगेहात पकडणेत आले असून त्यांच्याविरुध्द शाहूपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा नोंद करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री.संदिप दिवाण पोलीस उपआयुक्त/पोलीस अंधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री.गिरीष गोडे, पोलीस उपअधीक्षक यांचे मार्गदर्शना नुसार, श्री.मारूती पाटील, पोलीस निरीक्षक, सफौ. शाम बुचडे, पोना.शरद पोरे व पोकॉ.रुपेश माने, मयुर देसाई चालक पोहेकॉ.गुरव ॲन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कमांकावर संपर्क साधावा.**

१) मा.महासंचालक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१
२) मा.पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे
दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३
३) श्री.गिरीष गोडे , पोलीस उपअधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर ८१०८६६०७०७, ०२३१/२५४०९८९.
४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक :- १०६४.
५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३